६६ ८२१०८

परवानगी वर्ष : २००४-२००५
माध्यम : मराठी

कायम विना अनुदान

जा.क्र.माध्य-३/१४/प्रथम मान्यता/पुवि/२० ०६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक :- 14 MAR 2006

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे ........

विषय :- प्रथम मान्यता...
राजा शिवछत्रपती शिवाई विद्या. कुसूर, ता-जुन्नर, जि-पुणे.

संदर्भ :- १. आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ब-४/प्र.मा/४३९७५/दि. २३/११/

२. शा.प.क्र. नमाशा/२००४/[१६९/०४] माशि-१ दि. २३/६/०४

३. कार्यालयाचे पत्र क्र माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुवि/१६७३३/२००५ दि. २६/८/२००५

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये श्री. गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतूर, ता-जुन्नर, जि-पुणे ........ संस्थेच्या राजा शिवछत्रपती शिवाई विद्या. कुसूर, ता-जुन्नर, जि-पुणे. .......... माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००४-२००५ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००४ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतचा अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे १ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

१. मुख्याध्यापक ........ राजा शिवछत्रपती शिवाई विद्यालय, कुसूर
२. निम्नस्वाक्षरी ता-जुन्नर, जि-पुणे.